**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**
**महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या**
(A Government of Maharashtra Undertaking)
( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

**Dadasaheb Phalke Chitranagari (दादासाहेब फाळके चित्रनगरी ) गोरेगाव पूर्व, मुंबई**
Filmcity, Mumbai
https://filmcitymumbai.org

---

## 'छावा' चित्रपटाचं शूटिंग झालंय गोरेगाव फिल्मसिटीत

२० फेब्रुवारी मुंबई : छत्रपती संभाजी महाराज (Chhatrapati sambhaji Maharaj) यांच्या जीवनावर आधारित 'छावा' (Chhaava) हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा रुपेरी पडद्यावर साकारलेला जीवनपट प्रेक्षकांना चांगलाच भावतोय. लक्ष्मण उतेकर (Laxman Utekar) दिग्दर्शित 'छावा' या चित्रपटात विकी कौशलने (Vicky Kaushal) छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. तर रश्मिका मंदानाने (Rashmika Mandanna) महाराणी येसूबाईंच्या भूमिकेला न्याय दिला आहे. ऐतिहासिक कथा आणि दमदार सिनेमॅटोग्राफीमुळे प्रेक्षकांचा या चित्रपटाला भावनिक प्रतिसाद मिळतोय. विशेष म्हणजे प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असलेल्या या चित्रपटाचं देशभरात अनेक ठिकाणी चित्रीकरण पार पडलं असून मुंबईतील गोरेगाव फिल्मसिटीमध्येही या चित्रपटाचं चित्रीकरण पार पडलं आहे.

गोरेगाव फिल्मसिटीमध्ये अनेक चित्रपटांचं, वेबसीरिजचं, मालिकांचं , जाहिरातींचं शूटिंग नेहमीच पार पडत असतं. सध्या सर्वत्र चर्चेत असणाऱ्या 'छावा' या चित्रपटातील लोकांना भावणाऱ्या थरारक दृष्यांचं चित्रीकरणदेखील मुंबईतील हिरवाईने नटलेल्या गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीत पार पडलं आहे.

शूटिंगसाठी गोरेगाव फिल्मसिटी उत्कृष्ट पर्याय

दादासाहेब फाळके चित्रनगरीत आघाडीची कलागारे (स्टुडिओ) आणि चित्रीकरणासाठी अद्ययावत असणाऱ्या सुविधा आहेत. मुंबईच्या निसर्गरम्य परिसरात ही चित्रनगरी वसली आहे. तब्बल 16 कलागारे आणि 70 पेक्षा जास्त बाह्य व नाविन्यपूर्ण चित्रीकरण स्थळांसह डोंगर, तलाव यांसारखी

नैसर्गिक स्थळेही चित्रनगरीच्या हद्दीत चित्रीकरणासाठी उपलब्ध आहेत. चित्रनगरीत आजवर भारतीय चित्रपटसृष्टीतील अनेक 'ब्लॉकबस्टर' आणि 'सुपर-मेगा-ब्लॉकबस्टर' चित्रपटांचे चित्रीकरण झाले असून मराठीसह भारतीय सिनेविश्वाच्या वाढ आणि विकासात चित्रनगरीने अमूल्य योगदान दिले आहे.